
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 11 | JULY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्वामी विवेकानंद व अरविंद घोष यांच्या राष्ट्रवादी विचारांचा तुलनात्मक अभ्यास



प्रा. डॉ. लक्ष्मण बाबाराव यादव
राज्यशास्त्र विभाग,
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा.

**प्रस्तावना :-**

आधुनिक भारताच्या जडणघडणीत व भारतीय पुनर्जनाचे प्रणेते वेदांत प्रचार व असामान्य महापुरुष भारतीय युवकांमध्ये राष्ट्राबद्दल प्रेम निर्माण करून, राष्ट्र कार्यात महत्वपूर्ण योगदान देणारे. की ज्यांच्यामुळे भारतीय स्वतंत्र लढ्याला मानसिक व सांस्कृतिक बळ मिळाले. अश्या या महान तत्त्ववेत्याचा जन्म 12 जानेवारी1863 रोजी पश्चिम बंगालमधील कलकत्ता येथे झाला. स्वामीजींचा राष्ट्रवाद हा अध्यात्मिक्तेवर आधारलेला होता. सहिष्णुता, समानता आणि सार्वत्रिकता या घटकावर पुढे जाणारा राष्ट्रवाद होता. त्यांचे राष्ट्रवादी विचार आधुनिक भारताच्या जडणघडणीत फार मोठे योगदान देणारे ठरतात.त्यांचा राष्ट्रवादी हा अध्यात्मिक,सांस्कृतिक सामाजिक आणि मानवी मूल्य जोपासणारा होता. अशा या महान तत्वेत्यांचं मृत्यू 4जुलै 1902 रोजी झाला.

अरविंद घोष यांचे राष्ट्रवादी विचार हे देखील भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे ठरतात त्यांच्या राष्ट्रवादाला केवळ राजकीय स्वातंत्र्याची उद्दिष्ट नव्हते तर ते नैतिक,अध्यात्मिक, सांस्कृतिक जागृतीवर आधारित भारतीय राष्ट्रवाद अस्तित्वात होता.अशा या राष्ट्रवादी तत्त्ववेत्यांचा जन्म15 ऑगस्ट 1872 पश्चिम बंगालमधील कोलकत्ता येथे झाला. देशातील युवकांमध्ये राष्ट्रवादी भावना निर्माण करण्याकरता अरविंद घोष यांनी अथक प्रयत्न केले लोकमान्य टिळक बिपिन चंद्र पाल लाला लजपतरॉय इत्यादी जहालमतवादी नेत्याशी त्यांचा संपर्क आला. आणि जहाल जहाल राष्ट्रवादी विचारसरणी स्वीकारली व शेवटी 5 डिसेंबर 1950 रोजी पांडिचेरी येथील आश्रमात घोष यांनी पांडेचेरी येथील आश्रमास समाधी घेतली.

स्वामी विवेकानंद व अरविंद घोष हे भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासातील दोन प्रभावशाली विचारवंत आहेत. विवेकानंदांनी आध्यात्मिक-सांस्कृतिक जागृतीद्वारे राष्ट्रवादाची पायाभरणी केली, तर अरविंदांनी राजकीय क्रांती, अध्यात्म आणि 'पूर्णयोग' यांच्या आधारे राष्ट्रवादाचे उन्नत तत्त्वज्ञान विकसित केले.

**राष्ट्रवादाची मूलभूत संकल्पना :-**

**स्वामी विवेकानंद**

राष्ट्राची आत्मा म्हणजे धर्म व अध्यात्म स्वामीजींच्या राष्ट्रवादाचा आधार संनातन भारतीय संस्कृती, वेदांत, मानवता व सेवा हा असून तो भारतीय नागरिकांमध्ये पुरेपूर रुजवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सर्व भारतीयांना त्यांनी ***"उठा, जागे व्हा"*** हा संदेश देऊन, भारतीय मधील सुप्त शक्ती जागृत केली. स्वामीजींनी भारतीय समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीला राष्ट्रनिर्मितीचा केंद्रबिंदू मानले.

**अरविंद घोष**

अरविंद घोष यांनी राष्ट्र म्हणजे सजीव दैवी शक्ति Mother India अशी मानून राष्ट्राची संकल्पना मांडली राष्ट्रवाद हा आध्यात्मिक, सांस्कृतिक तसेच राजकीय मुक्तीचा संघर्ष आहे.परकीय जोखडातून भारत मुक्त होणे ही दैवी कृतीची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आणि त्यांनी भारतीय राष्ट्रवादाचा उद्देश भारताला विश्वगुरू बनविणे हा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**२. राष्ट्रनिर्मितीचे साधन :-**

**स्वामी विवेकानंद :-**

स्वामी विवेकानंदानी राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण, चरित्रनिर्मिती, आत्मविश्वास, सामाजिक सुधारणांद्वारे राष्ट्रनिर्मिती केली पाहिजेअसे ते म्हणत. एकसंघ व अखंड भारत म्हणून निर्माण करायचा असेल तर भारतातील गरीबी, अज्ञान, जातिभेद यांचे निर्मूलन करणे अत्यावश्यक असल्याचे म्हटले.स्वामी विवेकानंद पुढे असे म्हणतात की,सामाजिक व सांस्कृतिक पुनर्जागरण हे स्वातंत्र्याच्या संघर्षाचे मूलभूत साधन आहे.

**अरविंद घोष**

अरविंद घोष राष्ट्र निर्मितीचे साधने स्पष्ट करत असताना क्रांती, राजकीय संघटन, चरमपंथी राष्ट्रवाद यावर प्रारंभीचा भर होता.स्वदेशी आंदोलन, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, निषेध हे प्राथमिक मार्ग त्यांनी स्पष्ट केले नंतरचा मार्गअध्यात्माधिष्ठित राष्ट्रनिर्मिती (योग, साधना, अंतर्मुख परिवर्तन) या साधनाकडे त्यांचा कल होता. त्याकरिता शक्ती, त्याग, आत्मबळ यांच्या योगाने राष्ट्राची उभारणी झाली पाहिजे असे अरविंद घोष यांना वाटत होते.

**३. धर्म व अध्यात्माची भूमिका :-**

**स्वामी विवेकानंद**

स्वामी विवेकानंद यांचे धर्म व अध्यात्म याबाबतची भूमिका स्पष्ट करत असताना धर्म हा भारतीय राष्ट्रवादाचा आधार आहे.सर्व धर्मांच्या ऐक्यावर आधारित सार्वत्रिक अध्यात्मवाद स्वामीजींना मान्य होता. स्वामीजी पुढे असे म्हणत की,हिंदू धर्माचे तत्वज्ञान जगासाठी प्रकाशमान ठरतात.

**अरविंद घोष**

अरविंद घोष धर्म आणि अध्यात्म याबाबतीत विचार स्पष्ट करत असताना,अध्यात्म भारताची दैवी ध्येयपूर्तीची कळी आहे.असे म्हणत.

स्वामीजींनी Integral Yoga मधून मानवी विकासाला नवे परिमाण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.
राष्ट्रसेवा हीच योगसाधना स्वामीजींना मान्य होती.
आध्यात्मिकता + राजकारण = भारताचे विश्वधर्मनेतृत्व हे खरोखरच त्रीकालाबादीत सत्य ठरते.

**४. राजकीय राष्ट्रवाद :-**

**स्वामी विवेकानंद**

स्वामीजींचा राजकीय राष्ट्रवाद थेट राजकारणात सहभागी होण्याला विरोध करतो. परंतु त्यांनी दिलेली सांस्कृतिक जागृती भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा पाया बनली. त्यांनी राष्ट्रवादाला धार्मिक व सामाजिक जागृतीचे रूप दिले.

**अरविंद घोष**

अरविंद घोष यांचा राजकीय राष्ट्रवादी थेट, प्रखर, क्रांतिकारक राजकीय नेतृत्वास मान्यता देतो.
वंदेमातरम्, मराठा, कर्मयोगिन सारख्या पत्रांद्वारे भारतीयामध्ये राजकीय प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्वशासनाऐवजी पूर्ण स्वातंत्र्य (पूर्ण स्वराज्य) यांची पहिली मांडणी अरविंद घोष यांनी केली.

**५. समाजदृष्टी :-**

**स्वामी विवेकानंद**

स्वामींजीचे राष्ट्रवादा संबंधी विचार स्पष्ट करत असताना. त्यांनी समाजाची एकता, समता व समरसता यांवर भर दिला.अस्पृश्यता, जातिभेद, स्त्रीशिक्षण यांचे जोमाने समर्थन स्वामीजींनी केले. पुढे त्यांना असेही वाटत होतें की, भारतीय समाजाचा आत्मविश्वास वाढवणे आवश्यक आहे.

अरविंद घोष तर अरविंद घोष यांचे राष्ट्रवादासंबंधी विचार स्पष्ट करत असताना.भारतीय समाज दैवी ध्येयपूर्तीचा आधारस्तंभ आहे.

राष्ट्राची सामूहिक शक्ती वाढावी यासाठी समाजसंघटन यावर त्यांनी भर दिला.समाजातील दुर्बल घटकांचे उन्नयन राष्ट्रप्रगतीचा एक भाग ठरतो.

### ६. पाश्चिमात्य संस्कृतीविषयी दृष्टिकोन

### स्वामी विवेकानंद

पश्चिमात्य संस्कृती बद्दल आपले विचार स्पष्ट करत असताना स्वामीजी असे म्हणतात की, पाश्चिमात्यांच्या विज्ञान, तंत्रज्ञान, संघटन व सामाजिक रचनेचे त्यांनी कौतुक केले.

भारतीय अध्यात्म + पाश्चिमात्य विज्ञान = आधुनिक भारत

हे समीकरण त्यांनी मांडले.

### अरविंद घोष

अरविंद घोष यांनी पश्चिमात्य संस्कृती बद्दल विचार स्पष्ट करत असताना त्यांनी, पाश्चिमात्य राजकीय विचारांचे विश्लेषण केले, पण भारताचे ध्येय वेगळे मानले.भारताची शक्ती अध्यात्मात आहे पाश्चिमात्य अनुकरणापेक्षा स्वतःची ओळख महत्त्वाची असा फरक त्यांनी केला.

### ७. उद्दिष्ट :-

### स्वामी विवेकानंद

स्वामीजींचे राष्ट्रवादी उद्दिष्ट स्पष्ट करत असताना त्यांनी एकात्म, शक्तिशाली, नैतिक व मानवतावादी भारत निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले.धार्मिक-सांस्कृतिक पुनर्जागरणातून सामाजिक परिवर्तन घडून आणन्यावर त्यांचा अधिक भर होता.

### अरविंद घोष

तर अरविंद घोष यांच्या राष्ट्रवादीचा उद्देश स्वातंत्र्यप्राप्त, दैवी ध्येयपूर्ती करणारा आध्यात्मिक राष्ट्र अशा स्वरूपाचा होता.भारत जागतिक शांततेचे नेतृत्व करेल जगाला शांततेच्या व शाश्वत विकासाच्या मार्गावर नेण्यात भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरेल असे घोष यांना वाटत होते.

### तुलनात्मक निष्कर्ष (सारांश) :

स्वामी विवेकानंद व अरविंद घोष यांच्या राष्ट्रवादी विचारांचे अध्ययन केल्यानंतर त्यांच्या विचारांचे विविध पैलू तुलनात्मक दृष्ट्या आपणास स्पष्ट करता येईल. राष्ट्रवादाचा पाया अध्यात्म + संस्कृती, अध्यात्म + राजकारण यावर होता.

त्याबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक पुनर्जागरण घडून आणणे. स्वातंत्र्य लढायला योगाची साथ असावी. तसेच त्यांच्या राष्ट्रवादाचे साधन शिक्षण, सेवा, पुनर्जागरण क्रांती, संघटन, आणि साधना होते.राजकारणातील जनतेचा सहभाग अप्रत्यक्ष,प्रत्यक्ष व सक्रिय असा होता.भारताचे ध्येय मानवता, समता, नैतिकतेचे जगाला मार्गदर्शन विश्वगुरू भारत निर्माण, मानवतेची आध्यात्मिक उन्नती राष्ट्रदृष्टी समाजसुधारक अशा स्वरूपाची होती.

यावरून आपणाला अशी म्हणता येते की,स्वामी विवेकानंदांनी भारताच्या राष्ट्रवादाला सांस्कृतिक-आध्यात्मिक अधिष्ठान दिले, तर अरविंद घोष यांनी त्याला राजकीय, क्रांतिकारक तसेच गूढ आध्यात्मिक तात्त्विक उंची प्राप्त करून दिली. दोघांचेही राष्ट्रवाद एकमेकांना पूरक असून आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचे हे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) भारतीय राजकीय विचारवंत- श्रीकांत विदेशपांडे

2) भारतीय राजकीय विचारवंत - प्रा डॉ कृ दि बोराळकर

3) भारतीय राजनीतिक विचारक - ओम प्रकाश गाबा

4) Indian Political Thinkers - Dr Sunita Gangwal

5) भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार - प्रा राम मुठाळ

6) भारतीय समाज और संस्कृती- डॉ कृष्णदत्त द्विवेदी